दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २० जून २०२५ | अंक १८३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


जीवनातील खरी सुख-शांती अहंकारमुक्त जीवनात आहे


SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007 | All TOURS घर से घर तक | दिल से दिल तक | 1st TIME in TRAVEL INDUSTRY | www.suntourismpune.in

सन टुरिझम प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555


# हिंमत असेल तर हे करुन दाखवाच

# उद्धव ठाकरेंचं फडणवीसांना ओपन चॅलेंज

मुंबईमध्ये आज शिवसेनेचा वर्धापन दिन साजरा होत आहे. शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त शिवसेना ठाकरे गटाकडून षण्मुखानंद सभागृहात कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमामध्ये बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. हिंदी भाषेच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ओपन चॅलेंज दिलं आहे. हिंमत असेल तर हिंदीची सक्ती करूनच दाखवा असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. नेमकं काय म्हणाले उद्धव ठाकरे? राज्यात पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्यात येणार आहे, यावरून राज्यात चांगलंच वातावरण



तापलं आहे. हिंदी भाषेच्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरे यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. 'या देशाची या लोकांनी वाट लावली. आता शिवसेना संपवण्याची वाट पाहत आहेत. अरे तुम्ही कितीही स्वप्न पाहा शिवसेना तुमच्या भ्रष्टाचाराला संपवून तुमच्या छाताडावर नाही भगवा रोवला तर नाव नाही सांगणार. फक्त एक गोष्ट लक्षात ठेवा. आपल्याला भांडून चालणार नाही. भाजपची जी नीती आहे, त्यांनी विधानसभेत नारा दिला होता. बटेंगे ते कटेंगे. आपल्याला वाटलं हिंदू मुसलमान, आता मुंबईत हिंदू हिंदूत मारामाऱ्या लावायच्या, हिंदी सक्तीची करायची, हिंदी सक्तीची झाली की ९२-९३ ला ज्या लोकांना वाचवलं होतं, त्यांनाच आपल्यापासून तोडायचं. हिंदी सक्ती तर होऊ देणारच नाही. करायची असेल हिंमत तर देवेंद्र तुम्ही करून दाखवाच . हिंदीचं आमचं वैर नाही, पण सक्ती कशासाठी? हिंदी सक्तीची करायची असेल तर तामिळनाडूमध्ये जाऊन पाहा, काय करतात ते. हिंदीची सक्ती गुजरातमध्ये केली नाही, आधी गुजरातमध्ये हिंदी सक्तीची करा. इथे आपल्याला भांडत ठेवायचं, निवडणुकीच्या तोंडावर आपण एकत्र राहतो. मराठी अमराठीत भांडण लावायची, मग हे भष्ट्राचार करायला मोकळे असा घणाघात यावेळी उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला आहे. दरम्यान यावेळी त्यांनी ऑपरेशन सिंदूरवरून देखील केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे.

## शारदा इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थ्यांचा बालवयापासूनच पाया भक्कम झाल्याने शाळेने यशाचे शिखर गाठले-रमेशराव आडसकर

केज । वार्ताहर शारदा इंग्लिश स्कूल केज, शारदा इंग्लिश स्कूल कळंब व शारदा इंग्लिश स्कूल धारूर येथील शिक्षकांचे संयुक्त प्रशिक्षण दिनांक १३.०६.२०२५ व १४.०६.२०२५ रोजी शारदा इंग्लिश स्कूल केज या ठिकाणी घेण्यात आले. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पडलेल्या या प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस चे सचिव मा रमेशरावजी आडसकर यांची उपस्थिती होती. याप्रसंगी व्यासपीठावर शारदा इंग्लिश स्कूल केज चे प्राचार्य मिश्रा एस एम, शारदा इंग्लिश स्कूल कळंब चे प्राचार्य भूषण गवळी, शारदा इंग्लिश स्कूल धारूरच्या प्राचार्या श्रीमती हजारी




ज्योती यांची उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे सचिव माननीय रमेश रावजी आडसकर यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना सांगितले की शिक्षक प्रशिक्षण हा शिक्षणाच्या प्रक्रियेतील एक महत्वाचा भाग आहे. शिक्षकांना सक्षम आणि अद्ययावत ठेवल्यास, ते विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण देऊ शकतात, ज्यामुळे समाजाचा विद्यार्थ्यांचा बालकांचा विकास साधता येतो. शारदा इंग्लिश स्कूल केज, कळंब किंवा धारूर येथील शाळांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या सुरुवातीच्या काळातच म्हणजे नर्सरी, एलकेजी, युकेजी,पहिली पासूनच पाया भक्कम केल्याने यशाचे शिखर गाठले आहे. याचे सर्व श्रेय समोर बसलेल्या अध्यापकांना देताना शालेय प्रशासनाचे कौतुक त्यांनी केले. याचबरोबर उइडए नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार प्रशिक्षण देण्यासाठी आलेल्या श्री राहुल उमर्डे कर नागपूर... व श्री डॉ. विशाल इंगळे जालना यांचेही आभार व्यक्त करून शिक्षकांना अतिशय उत्कृष्ट प्रशिक्षण दिल्याबद्दल अभिनंदन केले. शारदा इंग्लिश स्कूल केज चे प्राचार्य मिश्रा एस एम यांनी दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरामध्ये कोण कोणते महत्त्वाचे उल्लेखनीय बाबी झाल्या त्याचा पुनरुचार केला व निश्चितच येणाऱ्या वर्षभरात विद्यार्थ्यांना त्याचा फार मोठ्या प्रमाणात फायदा होईल असा आशावाद व्यक्त केला. तसेच शारदा इंग्लिश स्कूल केज येथील प्रायमरी पासून असलेले विद्यार्थ्यांचे यशाचे प्रमाण हे मोठे आहे

## बीड शहरवासियांनी योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित रहावे

बीड । प्रतिनिधी प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिपमाळ योगा बहुउद्देशीय संस्था,बीड तथा माहेश्वरी प्रगती मंडळ, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने अकराव्या जागतिक योग दिवसानिमित्त शनिवार दि. २१ जुन २०२५ रोजी सकाळी ठीक ०५.४५ ते ०७.०० या वेळेत वृंदावन लॉन्स, एमआयडीसी रोड, बीड येथे मोफत योग शिबिराचे आयोजन करण्यात आले असून याप्रसंगी बीड शहरातील योगप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन दिपमाळ योगा बहुउद्देशीय संस्था बीडचे अध्यक्ष विष्णुदास बियाणी, महामंत्री योग प्रशिक्षक ड. डॉ. राजेन्द्र सारंडा,उपाध्यक्ष सुरज लाहोटी, सचिव , कोषाध्यक्ष उमेश कासट,सह सचिव संतोष सोहनी, प्रकल्प सभापती अमर सपकाळ, माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कासट, उपाध्यक्ष संतोष टवाणी, सचिव जुगल किशोर बियाणी, कोषाध्यक्ष जगदीश सिकची, सहसचिव राजेन्द्र चरखा, प्रकल्प सभापती सी.ए. गोपाल कासट, डॉ. बद्रीनारायण झंवर, भगिरथ चरखा, ईश्वर चरखा, नंदकिशोर जेथलिया, गणेश कासट, गोविंद लाहोटी, हरीश मालू, संजय मुंदडा, राम मानधने, रवी राठी, अशोक सिकची, रमेश सोमानी, अनिल वट्टमवार, , अजिंक्य चांदणे, शेखर महाद्वार, अशोक राऊत, चांदणे बंधू, शिवाजी भुरे, नागेश मिटकरी, अशोक शहागडकर, सुनील मिटकरी, नवनाथ गोरे,

## बीडचे खा.सोनवणे पोहचले ब्राझीलमध्ये

### ऊस उत्पादकांसाठी नवीन तंत्रज्ञानाची पाहणी



बीड । प्रतिनिधी जगातील सर्वाधिक ऊस उत्पादन करणारा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्राझीलमध्ये आयोजित मइंडिया ब्राझील शुगर अँड बायो एनर्जी मिशनफ या अभ्यास दौऱ्यात बीडचे खा.बजरंग सोवणे यांनी सहभाग नोंदविला आहे.

## विद्यार्थ्यांनी सर्व विषयांमध्ये ज्ञानक्षम व्हावे - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

सातारा । प्रतिनिधी शाळा संस्कार घडविणारे मंदिर असून या मंदिरात शिक्षक हे देशाची उज्वल भावी पिढी घडवित असतात. विद्यार्थ्यांनीही कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती यांसह सर्व विषयांमध्ये संपूर्ण ज्ञानक्षम होण्यासाठी शिक्षकांना प्रतिसाद द्यावा. विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करुन मोठे व्हावे व देशाचा तसेच राज्याचा नावलौकीक वाढावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. सातारा तालुक्यातील कोडोली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक केंद्र शाळेत शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ङ्ममाझी शाळा आदर्श शाळाफ उपक्रमांतर्गत उभारण्यात आलेल्या शाळेचेही उद्घाटन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. यावेळी आमदार महेश शिंदे, आमदार मनोज घोरपडे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शबनम मुजावर आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी विविध उपक्रम राज्यशासन राबवित आहे. या शाळांमधील विद्यार्थी उच्च पदावर काम करित आहेत. माजी राष्ट्रपती स्व. ए.पी.जी. अब्दुल कलाम, राष्ट्रती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानींही शासकीय शाळांमध्ये शिक्षण घेतलेले आहे. शासनाचा आनंददायी शिक्षणावर भर आहे. विद्यार्थ्यांनी कोणताही दबाव न घेता शिक्षणाबरोबर खेळावरही भर दिला पाहिजे. सातारा जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या ङ्ममाझी शाळा आदर्श शाळाफ हा उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे. शिक्षण विभागात अमुलाग्र बदल केले आहेत यामध्ये विद्यार्थ्यांचे दप्ताराचे ओझे कमी करणे, आनंददायी शिक्षण, मुलींना उच्च शिक्षण मोफत यासह अनेक योजना राज्य शासन राबवित आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघर्ष करा व संघटीत व्हा असे सांगतले होते. त्यांनी लिहिलेल्या राज्यघटनेवर देशाचा कारभार चालत आहे.

## मान्सूनपूर्व पावसामुळे पेरणी झालेल्या पिकाची पिंपळनेर भागात चांगली वाढ

पिंपळनेर-प्रतिनिधी बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात नुकत्याच झालेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे शेतकऱ्यांनी तातडीने नियोजन करून लगबगीने खरीप हंगामातील मका पिकांची पेरणी मोठ्या प्रमाणावर केली आहे. पेरणी झालेले मक्याचे पीक सध्या चांगलेच उगवून आले असून, सध्या सुरू असलेला मान्सूनचा पाऊस मका पिकांच्या वाढीसाठी फायदेशीर ठरत आहे. बीड तालुक्यातील जवळा, ईट, घाटसावळी, ताडसोन्ना, रंजेगाव सह काही भागात गेल्या तीन-चार दशकांपासून मक्याचे पीक मोठ्या क्षेत्रावर तीनही हंगामांत घेतले जात आहे. या पिकाने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार दिला असून, शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीमध्ये मका पिकांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे चालू खरीप हंगामामध्ये समाधानकारक पाऊस होताच शेतकऱ्यांनी उपलब्ध क्षेत्रावर मक्याची पेरणी केली. मका बियाण्यांच्या किंमतीमध्ये बियाणे कंपन्यांनी चालू खरीप हंगामात वाढ केल्याने शेतकरी बांधवांनी नाराजी व्यक्त केली. सध्या सर्वत्र मक्याचे उगवलेले पीक दिसून येत आहे. आगामी काळात पिकांच्या वाढीच्या अवस्थेत लष्करी अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कीटकनाशकांची फवारणी करावी लागणार आहे. लष्करी अळीचा वेळेत बंदोबस्त केला तर मक्याचे समाधानकारक उत्पन्न येते, अशी माहिती प्रगतशील युवा शेतकरी अशोक जाधव, श्रीकांत ठोकरे, (पिंपळनेर) यांनी दिली. जनावरांच्या हिरव्या चाऱ्यासाठी मका पिकांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. तसेच, मका पिकांपासून शेतकरीवर्ग मुरघास तयार करीत आहेत. शिवाय, बाजारामध्ये मक्याला प्रतिक्विंटल चांगला बाजार मिळत असल्याने शेतकऱ्यांना नियमित आर्थिक उत्पन्न मिळत आहे. त्याचप्रमाणे मका पिकाच्या काढणीनंतर वाळलेल्या मकवानाची साठवणूक करून चाऱ्यासाठी वापर केला जात आहे. शिवाय बुरकुडाचा वापर देखील ज्वलनासाठी होत आहे.

## पाटोदा येथे प्रियदर्शनी प्राथमिक शाळेसह कन्या प्रशालेत पालक मेळावा उत्साहात

## डॉ.सारिकाताई क्षीरसागरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; पालकांसोबत साधला संवाद

### दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आम्ही कटिबद्ध-डॉ.सारिकाताई क्षीरसागर

गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच मुलींच्या सुरक्षिततेलाही आम्ही प्राधान्य दतो. डॉक्टर, इंजिनिअरच्या पलीकडेही मुलींनी स्पर्धा परीक्षा, प्रशासन व इतर विविध क्षेत्रांकडे वळावे यासाठी शाळेत योग्य मार्गदर्शन दिले जाते. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे. पालकांनी केलेल्या सुचनांचे आम्ही काटेकोरपणे पालन करुन अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी दिली.



बीड (प्रतिनिधी)दि.१९ : येथील विनायक युवक कल्याण संस्था संचलित पाटोदा येथील प्रियदर्शनी प्राथमिक शाळा आणि प्रियदर्शनी कन्या प्रशालेत गुरुवारी (दि.१९) पालक मेळावा उत्साहात पार पडला. या दोन्ही कार्यक्रमात कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच, पालकांसोबत संवाद साधला.पाटोदा येथील प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत डॉ.क्षीरसागर यांच्यासह संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधीक्षक डॉ. विश्वंभर देशमाने, माजी मुख्याध्यापक एस.आर. जाधव, माजी नगरसेवक संदीप जाधव, श्रीमती.अडागळे, श्रीकांत लांडगे, आशा जाधव, श्रीमती.कदम, पालक प्रतिनिधी भीमराव घोलप, भास्कर मिसाळ, ज्ञानेश्वर चापकानडे, श्रीमती.बनगे, शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक पवनकुमार मोरे, श्रीकांत लांडगे, बबन राख, पोपट उगले, संकेत माताडे, जयश्री शेलार, नवनाथ ठाकणे, अनिल राख, प्रताप नवले, रवि काळे, मुळे, अविनाश तिडके यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम शाळेच्या वर्धापन दिनाच्या औचित्य साधून आयोजित केला होता. तसेच, शहरातील प्रियदर्शनी कन्या प्रशालेतील मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी बप्पासाहेब जाधव होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ.क्षीरसागर यांच्यासह नगराध्यक्षा दीपाली जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव, बीड जिल्हा पत्रकार संघाचे पाटोदा तालुकाध्यक्ष ॲड.महेश बेदरे, वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आबासाहेब हंगे, ॲड.तात्यासाहेब तवार, संदीप जाधव, जवाद शेख, मुन्ना शिंदे, सचिन गायकवाड, शाळेचे मुख्याध्यापक सचिन खोले, शिक्षक नवनाथ ढाकणे, दहिफळे आदींची उपस्थिती होती. यावेळी दहावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थिनी प्राप्ती घुमरे, देविका जाधव, बांगर, सय्यद शेख गौरव करण्यात आला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शुक्रवार २० जून २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## नका सांगू कोणाला, चांगले वाग म्हणून...

आता तो काळ राहिला नाही कोणाला चांगले वाग म्हणून सांगण्याचा.कारण कोणाला चांगले वाग म्हणून फुकटचा सल्ला दिला तर तो ऐकून घेईल आणि लगेच चांगले वागू लागला असे काही घडणार नाही.याउलट जर आपण कोणाला चांगले वागण्याचा सल्ला दिला तर तो लगेच प्रतिक्रिया देईल की भावा माझ्या वागण्याचा तुला त्रास होत असेल तर ती तुझी समस्या आहे माझी नाही.मी कसे वागावे हे तू नको सांगू मला.मी चांगलेच वागतो तू कसे वागतोस ते तू बघ.हे बोलणे ऐकल्यावर वाईट वागणाऱ्याला चांगले वाग म्हणून फुकटचा सल्ला न दिलेला बरा. वाचक मंडळी हे खरे आहे की वाईट वागणे,वाईट बोलणे,वाईट चारित्र्य ठेवणे आणि वाईटांची संगत धरणे हे सर्वांचे आवडते छ ंद झाले आहेत.बऱ्याच पालकांचे पाल्य शिक्षणाबाबत गंभीर राहिलेले नाहीत. शाळेला किंवा कॉलेजला जात आहे म्हणून घरून निघायचे आणि वाईट,व्यसनी व चारित्र्यहीन मित्रांसोबत कुठ ` तरी भटकंती करायची.व्यसने करायची, वाईट बाता करायच्या आणि अमूल्य वेळ वाया घालवायचा हे आवडते छंद झाले आहेत.अशा मुलांना कोणी विचारणा केली तर निर्लज्जपणे म्हणतात,ओ अंकल तुम्ही नका आम्हाला शहाणपणा शिकवू,आम्ही काय करू नये व काय करावे हे सांगणारे तुम्ही आमचे कोण?आम्ही आमच्या आईवडिलांना घाबरत नाही तेव्हा तुम्हाला कोण घाबरेल. तुमची वाट पुढे बघून चालायला लागा.दारू पिणाऱ्यांना दारू पिऊ नये,दारू हानीकारक असते म्हणून सल्ला दिला की ते बोलतात कसे,पैसे आमचे,दारू आम्ही पितो त्रास तुम्हाला का होतो?आता यावर न बोलले बरे! एका घरी बराच वेळ झाला सासू सुनेचे जोरदार भांडण सुरू आहे.ते भांडण ऐकून सगळे शेजारी पूर्णतः वैतागून गेले आहेत.तरीपण ते भांडण सोडवायला कोणी पुढ ` येण्याचे धाडस करत नाही. सुनेची बाजू घेतली तर सासू खेकसते आणि सासूची बाजू घेतली तर सूनबाई नाराज होते.अशावेळी भांडण सोडवायला न गेलेले बरे! अशी भित्री मानसिकता झाली आहे लोकांची.वडिलांचे निधन झाल्यानंतर शेतीच्या वाटणीसाठी दोन भाऊ भांडण करतात,कोर्टात जातात, दोघेही वकील लावतात, वकीलाची मोठी फी भरतात आणि आपलेच नुकसान करून घेतात. खरेतर शेताच्या वाटणीचा प्रश्न सामंजस्याने ही मिटला असता. माझाच सख्खा भाऊ आहे गेला त्याला थोडा शेतीचा जास्त तुकडा तर काही बिघडत नाही अशी समजूत भावाने भावासाठी घ्यायला हवी होती.पण दोघांचे भांडण आणि दुसऱ्याचा लाभ ही कुत्सित मानसिकता आपण सोडायला तयार नाही!या दोन भावांना गावातील काही लोक चांगला सल्ला देतात पण दोघे भाऊ ऐकायच्या मानसिकतेचे नसतात.शेती वडिलांची,भांडण दोघा भावांचे आणि फायदा परक्या लोकांचा हे गावोगावी सुरू आहे. कामचुकार व्यक्तीला कामचुकार म्हटले की खूप राग येतो. भ्र ष्ट ाचा री व्यक्त ीला भ्र ष्ट ाचा री संबोधले की खूप राग येतो आणि व्याभिचार करणाऱ्या लोकांना चारित्र्यहीन म्हटले की राग येतो.तुम्ही वाईट कृत्ये केले तरीही समाजाने गप्प राहावे अशी तुमची मानसिकता कशासाठी? तुम्ही काहीही वाईट कृत्ये करावे आणि इतरांनी डोळे बंद करून घ्यावेत असे चालणार नाही.तुम्ही नेहमी वाईट वागायचे आणि चांगल्या लोकांनी ते मुकाटपणे सहन करायचे, तुम्हाला नावे ठ `वायची नाहीत ही मानसिकता बदला आता.तरीही तुम्हाला राग येतो.आणि तुम्ही चांगल्या लोकांवर बिनबुडाचे आरोप करता,चांगल्या लोकांना नावे ठेवता हे किती योग्य असते याचा विचार तुम्ही वाईट लोक कधीच करत नाही.कोणी चांगले वाग म्हणून सांगितले की तुमच्या अंगाचा तिळपापड होतो!

## पालीच्या तलाव , कपिलधार धबधब्याकडे जाताना स्वतःची काळजी घ्या : तहसीलदार शेळके हुल्लडबाजांवर कारवाई करु : पोलीस निरीक्षक मारुती खेडकर







बीड दि१९जून प्रतिनिधी
तालुक्यातील पाली या ठिकाणी असलेले बिंदूसरा धरण या ठिकाणी पाणी ओसांडत असून सध्या बीड येथील तरुणाई सेल्फी काढण्यासाठी, पोहण्यासाठी जाते . त्या ठिकाणी फेरफटका मारून सेल्फी काढतांना अनेक जण आढळतात . काही तरुण पाण्यामध्ये पडून त्यांना जीव देखील आपला गमवावा लागू शकतो . ही बाब गांभीर्याने घेत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी या ठिकाणी जलसंपदा विभाग व पोलीस विभागाने काळजी घेणे बाबत सूचित केले . त्या ठिकाणी कोणत्याही पर्यटक , नागरिकांनी किंवा कोणत्याही तरुणाने किंवा तरुणीने पाण्याच्या जवळ सेल्फी काढू नये किंवा त्या ठिकाणी पाण्यामध्ये उतरू नये यासाठी सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही अशा प्रकारच्या सुचना वेळोवेळी दिल्या आहेत .

दिनांक १९ जून , गुरुवार रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके , बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर , पाली महसूल विभागाच्या मंडळ निरीक्षक शितल चाटे यांनी नागरिकांना या ठिकाणी सेल्फी काढण्यासाठी सक्त मनाई केली . पर्यटक व नागरिकांना आवाहन केले आहे की कोणीही या ठिकाणी येऊन सेल्फी काढू नये किंवा पाण्याच्या मध्ये जाऊन कोणीही पोहू नये .

जलसंपदा विभागाच्या वतीनेही नागरिकांना असे आवाहन वेळोवेळी करण्यात आले आहे . त्यानुसार पाली येथील )तळ्यावर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी जाऊन पाहणी केली . त्यांच्या समवेत बीड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर तसेच पाली व मांजरसुंबा महसूल विभागाच्या मंडळ निरीक्षक शितल चाटे यांनी व पोलीस विभागाचे कर्मचारी या सर्वांनी त्या पाहणी केली . त्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला असलेले मका कणीस विकणारे किंवा त्या ठिकाणी असलेले आईस्क्रीमवाले , बर्फ गोळ्याचे गाडे हे छोटे मोठे व्यवसाय करणारे व्यवसायिक विनापरवाना या ठिकाणी येऊन थांबत असल्याने रिकामी गर्दी होते , वाहतुकीस अडथळा निर्माण होतो हे लक्षात घेता यांना सर्वांना तहसीलदार तसेच पोलीस निरीक्षक मारुती खेडकर व बीड ग्रामीण पोलीस स्टेशन मधील या भागाचे बिट अमलदार आतिश मोराळे , जमादार नामदेव सानप , डीएसबी रवींद्र झुनगूरे सह , मंडळ निरीक्षक शितल चाटे यांनी वरील सर्वांनी समजून सांगून त्या ठिकाणावरून आपापल्या हातगाडी घेऊन जाण्याचे तोंडी आदेश दिले . तात्काळ त्या ठिकाणावरून आपापले गाडे घेऊन बीडच्या दिशेने हे हातगाड्यावाले रवाना झाले . भविष्यात या ठिकाणी कोणीही विनापरवाना मका कणसाचे गाडे किंवा आईस्क्रीमचे गाडे येथे घेऊन येऊ नये व या ठिकाणी नागरिक या गाड्यांची गर्दी करणार नाहीत याची दक्षता घ्यावी नसता कायदेशीर कारवाई या आईस्क्रीम वाल्या गाड्या वर व मकाच्या कणीसवाल्या हातगाड्यावर करण्यात येईल असे पोलीस विभागाने कळिवले आहे .

यानंतर तहसीलदार व पोलीस निरिक्षक यांनी श्री क्षेत्र कपिलधार येथील धबधब्याच्या ठिकाणी भेट दिली . तेथील संस्थांनाच्या सचिव यांना सदरील ठिकाणी सुरक्षा रक्षक पूर्ण वेळ ठेवण्यात यावेत , धबधब्याच्या पाणी प्रवाहाच्या समोरील ठिकाणी जाळी लावणे , तसेच दरड कोसळणे , दगड पडणे या गोष्टी गृहीत धरून संरक्षणात्मक जाळी अथवा फेसिन्ग करण्याच्या सूचना दिल्या .

पर्यटक यांनी सुद्धा पर्यटन करत असताना स्वतःची, कुटुंबाची काळजी घेणे आवश्यक आहे . स्वानंद घेताना नियमही पाळले तर प्रशासनावर अतिरिक्त ताण येणार नाही .

## प्रवेश नोंदणीसाठी वाढवलेल्या मुदतीचा लाभ घ्यावा-प्राचार्य.डॉ.मरलापल्ले

जे विद्यार्थी काही अडचणी मुळे डिप्लोमा प्रवेश नोंदणी पासुन वंचित राहिले आहेत त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी प्रथम वर्ष डिप्लोमा प्रवेशांसाठी तंत्रशिक्षण संचनालय यांच्या मार्फत विद्यार्थ्यांसाठी प्रवेश नोंदणीसाठी मुदत वाढ देण्यात आली आहे,आता दि.२६-०६-२०२५ पर्यंत नोंदणी करू शकतात. नोंदणी करण्यासाठी जे इच्छुक विद्यार्थी आहेत त्यांनी एफ.सी.सेंटर -२१८२, म.शि.प्र.म संचलित,यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे नोंदणी साठी संपर्क साधावा तसेच दहावी नंतर प्रथम वर्षासाठी व ज्या विद्यार्थ्यांचा आय.टी.आय झालेला आहे किंवा बारावी सायन्स (गणित) झाले आहे असे विद्यार्थी थेट व्दितीय वर्ष प्रवेश घेण्यासाठी पत्र असतील. डिप्लोमा नंतर रोजगाराच्या संधीही भरपूर प्रमाणात उपलब्ध असतात,सरकारी नोकरी करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी ही एक सुवर्णसंधी ठरू शकते. रेल्वे, आर टी ओ, बांधकाम विभाग, एम.एस. ई.बी, महाजेनको इत्यादी विविध सरकारी नोकऱ्या उपलब्ध आहेत तसेच कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्यांना चांगल्या राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय कंपनी मध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या मिळालेल्या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा असे आवहन यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड चे प्राचार्य डॉ.बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी केले आहे.

## शेतकरी विकास व मराठा सेवा संघ प्रणित यशवंतराव चव्हाण मराठा मुलांचे वसतीगृह येथे प्रवेशाला सुरुवात

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा समाजातील गरीब व होतकरू मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी या दृष्टिकोनातून गेल्या पन्नास वर्षांपासून समाजातील दानशूर व्यक्तींच्या मदतीने मुलांचे वसतिगृह नवा मोंढा नांदेड येथे चालते १८ जुन २०२५ वार-रविवार पासुन वसतिगृहाचे प्रवेश अर्ज भरण्याची प्रकिया सुरू झाली आहे.इयत्ता दहावी पुढील शिक्षण व उच्चशिक्षण घेणार्या मराठा समाजातील गरजू मुलांनी आपला प्रवेश अर्ज ऑफलाईन स्वरूपात




व्यवस्थित न-चुकता भरून नवीन मोंढ्या मधील यशवंतराव चव्हाण मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या कमिटीकडे सादर करावा.आवेदन पत्र दाखल केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी १३ जुलै २०२५ वार-रविवार ठीक सकाळी १० वाजता वस्तिगृहाच्या कार्यालयात मुलाखत घेतली जाणार आहे.अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी आपले सर्व शैक्षणिक कागदपत्रांची सत्यप्रत घेऊन मुलाखतीस वेळेवर हजर राहावे. मुलाखतीस अनु-उपस्थित विद्यार्थ्यांचा प्रवेश नाकारला जाईल असे आवाहन वस्तिगृहाचे अध्यक्ष मधुकर देशमुख यांनी केले आहे अधिक माहितीसाठी ८३९०६४४६६८,९४२२१७०६२० या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधिकारी व आश्रमशाळा चालकांच्या उदासीनतेमुळे आश्रम शाळेतील मुलांकडे दुर्लक्ष शाळा प्रवेशासाठी हार, सत्कार तर दुरच निदान आस्थेने विचारपूस तरी करायला हवी :- डॉ.गणेश ढवळे

### आश्रमशाळा केवळ अनुदान लाटण्यासाठीच आहेत का?? :- डॉ.गणेश ढवळे

आश्रम शाळेतील निवासी विद्यार्थ्यांकरीता शासनाकडून प्रति विद्यार्थी २२०० रूपये प्रतिमाह परिपोषण अनुदान देत आहे.वसतिगृहात निवास व्यवस्था यामध्ये अंथरूण, पांघरूण,गादी, सतरंजी, ब्लँकेट तसेच भोजनाची व्यवस्था म्हणून ताट,वाटी,पेला, शैक्षणिक साहित्य यामध्ये वही,पेन,पाटी, पेन्सिल, विद्यार्थ्यांना २ शालेय गणवेश,नाईट ड्रेस तसेच केस कर्तन,तेल, साबण, दंतमंजन, कोलगेट यासह वैद्यकीय सुविधा म्हणून प्रथमोपचार तसेच करमणुक व खेळाचे साहित्य,पर्यायी विद्युत व्यवस्था, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही, सौर ऊर्जा उपकरणे आदी सुविधांसाठी लाखो रुपयांचा खर्च केल्याचे दाखवते.मात्र ब-याच आश्रम शाळेतील सीसीटीव्ही केवळ दिखावा असुन बंदच असतात. आश्रम शाळेतील निकृष्ट आहाराच्या तक्रारी आढळतात.भौतिक सुविधांची वानवा आढळून येते. शासन विद्यार्थ्यांवर खर्च करत असताना इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधिकारी आश्रमशाळा चालकांशी संगनमताने तक्रारींकडे व मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करत असल्याने आश्रमशाळा केवळ अनुदान लाटण्यासाठीच आहेत का?? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

बीड:- ( दि.१९ ) शाळा प्रवेशाच्या निमित्ताने संपुर्ण राज्यभर जिल्हा परिषदेच्या व खासगी संस्थेच्या शाळा मध्ये दि.१६ जुन रोजी नविन मुलांच्या प्रवेशासाठी जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मोठ्या उत्साहात चिमुकल्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना गणवेश,पुस्तक, वह्या,पेन आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.मात्र याचवेळी राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या ९७७ आश्रमशाळां मधील विद्यार्थ्यांचा जिल्हा प्रशासन तसेच शिक्षण विभागाला विसर पडल्याचे दिसून आले. या विभागामार्फत विमुक्त भटक्या जमाती विशेष मागास प्रवर्गाच्या आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला मुलींसाठीच्या निवासी शाळा, विद्यानिकेतन, निवासी कनिष्ठ महाविद्यालय आहेत.याठीकाणी विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी अधिकारी वर्ग सुद्धा उपलब्ध आहे.मात्र शाळा प्रवेशाच्या आनंद महोत्सवात बोटावर मोजण्याईतक्या शाळा वगळता बहुतांश शाळांमध्ये हा उत्सव साजरा करण्यात आलाच नाही. त्यामुळे आश्रम शाळा केवळ अनुदान लाटण्यासाठीच आहेत का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.सविस्तर माहितीस्तव बीड



जिल्ह्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमकुवत भटक्या व इतर मागास बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना निवासी व अनिवासी मोफत शिक्षण मिळावे या हेतूने बीड जिल्ह्यातील ३० संस्थे अंतर्गत ४५ प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रम शाळा कार्यरत आहेत. बीड जिल्ह्यात ४५ आश्रम शाळा मधून १० हजारापेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत असल्याची नोंद आहे. बीड जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या २३ असुन त्यात निवासी विद्यार्थी संख्या २५०० तसेच माध्यमिक शाळांची संख्या १४असुन त्यातून १००० पेक्षा जास्त आणि उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील निवासी विद्यार्थी संख्या ०८ असुन निवासी विद्यार्थी संख्या ५०० पेक्षा जास्त आहे. तर जिल्ह्यातील आश्रम शाळेतील निवासी विद्यार्थ्यांची संख्या ५००० पेक्षा जास्त आहे.

### इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधिकारी आणि आश्रमशाळा चालकांच्या उदासीनतेमुळे विद्यार्थ्यांच्या पदरी निराशाच :- धनंजय सानप ( महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघ महाराष्ट्र राज्य)

शैक्षणिक विषमतेची दरी नष्ट करत सामाजिक ध्रुवीकरण नष्ट करण्यासाठी सयाजीराव गायकवाड,, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, सावित्रीबाई फुले आदिंनी पुढाकार घेत भटक्या समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेतला.मात्र सद्यस्थितीत मागास प्रवर्गातील आश्रमशाळेतील योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असणारे प्रशासकीय अधिकारी आणि स्वार्थी आश्रमशाळा संचालक यांच्या आर्थिक लालसेपोटी विद्यार्थ्यांच्या मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असुन त्यांना शाळा प्रवेशासाठी होणा-या आनंदोत्सवात सुद्धा सहभागी करून घेण्याची आवश्यकता वाटत नाही. हे दुर्दैव असुन पुन्हा त्यांच्या पदरी निराशाच दिसून येत असल्याची खंत महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघाचे बीड जिल्हाध्यक्ष धनंजय सानप यांनी व्यक्त केली.

डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# पुरुषप्रधान क्षेत्रात स्त्रीशक्तीचा ठसा: मुमताज काझी

## आशियातील पहिल्या महिला डिझेल इंजिन ड्रायव्हर

मुमताज काझी आशियामधील सर्वात पहिली महिला डिझेल इंजिन ट्रेन ड्रायव्हर



प्रतिनिधी रेल्वे क्षेत्रासारख्या पारंपरिक पुरुषप्रधान विभागात आपल्या कर्तृत्वाची अमिट छाप उमठवणाऱ्या मुमताज काझी यांनी इतिहास रचला आहे. त्या आशिया खंडातील सर्वात पहिल्या महिला डिझेल इंजिन ड्रायव्हर ठरल्या असून, त्यांच्या धाडसाला आणि चिकाटीला संपूर्ण देशात सलाम केला जातो आहे. १९९१ साली मुमताज काझी यांनी रेल्वे इंजिन चालवण्यास सुरुवात केली. त्यावेळी महिला या क्षेत्रात दिसतही नव्हत्या, तेव्हा त्यांनी ही नोकरी केवळ स्वीकारलीच नाही, तर अत्यंत जबाबदारीने आणि कौशल्याने निभावली. त्यांच्या धाडसी निर्णयाने त्यांनी केवळ स्वत:चं करिअर घडवलं नाही, तर इतर महिलांसाठी एक नवा मार्ग खुला केला. मुमताज काझी यांचं म्हणणं आहे की, “जर आत्मविश्वास आणि मेहनत सोबत असेल, तर कोणतंही स्वप्न अशक्य राहत नाही.” त्यांनी आपल्या कार्यातून हे ठामपणे सिद्ध केलं आहे. आज मुमताज काझी केवळ एक इंजिन ड्रायव्हर नाहीत, तर संघर्ष, धैर्य आणि स्त्रीशक्तीचं प्रेरणादायी प्रतीक ठरल्या आहेत. त्यांच्या यशस्वी प्रवासाने अनेक तरुणींना स्वप्न बघण्याचं आणि त्यासाठी झगडण्याचं बळ दिलं आहे. स्त्री शक्तीच्या अशा प्रत्येक झळाळत्या उदाहरणास ‘प्रजा-शासन’ कडून मन:पूर्वक सलाम! ?

# लाडक्या बहिण योजनेवर आधारित मराठी चित्रपटाचा मुहूर्त संपन्न – आशिष शेलार यांच्या हस्ते उद्घाटन, मराठमोळ्या कलाकारांचा भरगच्च ताफा




प्रतिनिधी, मुंबई – महाराष्ट्रात गाजलेल्या आणि सर्वत्र चर्चेत असलेल्या ‘लाडकी बहिण योजना’वर आधारित मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या बहुचर्चित चित्रपटाचा भव्य मुहूर्त नुकताच भारतीय जनता पक्षाचे नेते आणि आमदार आशिष शेलार यांच्या हस्ते पार पडला. हा चित्रपट समाजातील वास्तव दर्शवणारा आणि भावनिक दृष्टिकोनातून सादर होणारा असून, महिलांच्या सक्षमीकरणाची आणि शासनाच्या योजनांचा समाजावर होणाऱ्या परिणामांची मांडणी करणारा आहे. चित्रपटामध्ये मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकारांचा समावेश असून, माधव अभ्यंकर, शशांक शेंडे, विजय पाटकर, उषा नाडकर्णी, गौतमी पाटील, भारत गणेशपुरे, आणि जयवंत वाडकर या मातब्बर कलाकारांच्या भूमिका प्रेक्षकांना अनुभवता येणार आहेत. मुहूर्ताच्या कार्यक्रमाला अनेक मान्यवर, निर्माते-दिग्दर्शक, कलाकार मंडळी आणि माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते. या चित्रपटाच्या माध्यमातून ‘लाडकी बहिण योजना’मधील सामाजिक संदेश अधिक प्रभावी पद्धतीने जनतेपर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे. चित्रपटाची निर्मिती लवकरच पूर्ण होऊन तो राज्यभरातील प्रेक्षकांसमोर झळकणार आहे. महिला सशक्तीकरणासोबतच लोकांमध्ये योजनांविषयी जनजागृती घडवणारा हा सिनेमा एक वैचारिक आणि सामाजिक संदेश देणारा ठरेल, असा विश्वास निर्मात्यांनी व्यक्त केला आहे.

# एलसीबीत नव्या चेहऱ्यांना संधी...पोलीस अधीक्षकांची यादी जाहीर - नऊ एलसीबी, चार बीडीडीएसमध्ये नियुक्त

** बीड - प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) आणि बॉम्ब डिटेक्शन अँड डिस्पोजल स्क्वॉड (बीडीडीएस) या विभागांमध्ये नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. पोलीस अधीक्षकांनी याबाबतची अधिकृत यादी नुकतीच जाहीर केली असून, एकूण तेरा कर्मचाऱ्यांची नव्या पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे. एलसीबीमध्ये नियुक्त झालेले अधिकारी - १. अंकुश वरपे - बीड ग्रामीण २. मनोज परजणे - बीड शहर ३. अशफाक अन्सार सय्यद - पेठ बीड ४. आनंद विष्णू मस्के - तलवाडा ५. दिलीप चंद्रभान गिते - केज डउ्झज वरून ६. गोविंद धर्मा राख - पिंपळनेर ७. रामचंद्र परशूराम केकाण - सिरसाळा ८. गोविंद व्यंकटी भताने - बर्दापूर ९. बबन झुंबर सलगर - अववळींळेपरश्र डझ कार्यालयातून बीडीडीएसमध्ये नियुक्त अधिकारी - १. सचिन भीमराव साळवे - बीड ग्रामीण २. अशोक सुभाष मंत्रे - अंमळनेर ३. विकास कचरू माळी - डीबीडीएस ४. बळीराम उत्तमराव भोसले - पाटोदा पोलीस अधीक्षकांनी केलेल्या या नियुक्त्यांमुळे गुन्हे तपास व सुरक्षा विभाग अधिक बळकट होण्याची शक्यता आहे. नव्या नियुक्त अधिकाऱ्यांकडून सक्षम आणि तत्पर कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

# जम जम कारखान्यासमोर वाळूचा डिंग - एक ते दीड महिन्यापासून नागरिक त्रस्त, भावी नगरसेवक लक्ष घालणार का?

बीड - प्रतिनिधी जम जम कारखान्यासमोर मागील एक ते दीड महिन्यापासून वाळूचा मोठा डिंग रस्त्यावर टाकून ठेवण्यात आलेला असून, त्याठिकाणी सुरू असलेल्या बांधकामामुळे परिसरातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. वाहतूक कोंडी, धूळधक्का आणि पावसात चिखलमय परिस्थितीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.
या रस्त्याने शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दुचाकीस्वार रोज ये-जा करत असतात. मात्र वाळूच्या डिंगामुळे रस्ता अडवून ठेवण्यात आल्यामुळे अपघाताचा





धोका वाढला आहे. परिसरातील नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे आता प्रश्न उपस्थित होतो की, भावी नगरसेवक या समस्येकडे लक्ष घालणार का? की केवळ निवडणुकीपुरतीच जनता आठवते? लोकांच्या सुरक्षेसाठी आणि सार्वजनिक रस्त्याचा वापर सुरळीत व्हावा यासाठी प्रशासनाने व भावी जनप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून वाळूचा डिंग हटवावा, अशी जोरदार मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# बीड जिल्ह्यात खुलेआम सुगंधित तंबाखू व माव्याची विक्री - प्रशासन गप्प? शेवगावात गुन्हे दाखल, पण बीड शहरात कायदा झोपलेला!

बीड - प्रतिनिधी राज्यात सुगंधित तंबाखू, मावा व गुटख्यावर बंदी असतानाही बीड जिल्ह्यात विशेषतः बीड शहरात हे पदार्थ खुलेआम विकले जात आहेत. शालेय परिसर, हॉस्पिटलजवळ, बस स्थानक परिसर आणि गल्लीबोळांमध्येही तंबाखू विक्रेते निर्धास्तपणे व्यवसाय करत आहेत. यामुळे युवकांमध्ये व्यसनाधीनता वाढत असून, आरोग्याच्या दृष्टिकोनातून हे धोकादायक ठरत आहे.
शेवगाव पोलिसांची तत्परता - गुन्हे दाखल
शेवगाव तालुक्यात मात्र स्थानिक पोलिसांनी कारवाई करत सुगंधित मावा विकणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये काही दुकानदारांवर फौजदारी कलमांखाली गुन्हे नोंदवण्यात आले असून, त्यांच्याकडून हजारोंचा मुद्देमाल



जप्त करण्यात आला आहे. बीड शहरात मात्र परिस्थिती भयावह - कायदा झोपलेला?
याउलट बीड शहरात प्रशासनाची भूमिका संशयास्पद ठरत आहे. सार्वजनिक ठिकाणी वशिला लावून किंवा पोलिसांच्या अश्रयात काही दुकानदार तंबाखू व मावा विक्री सुरूच ठेवत आहेत. काही ठिकाणी पोलिसांचे गस्त पथक समोरून गेले तरी कारवाई केली जात नाही, ही बाब नागरिकांना चकित करते.
नागरिकांचा रोष - आरोग्य विभाग कुठे झोपलाय?
स्थानिक नागरीक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन आणि पोलिस विभाग यांच्यावर कारवाईसाठी ताशेरे ओढले आहेत. ङ्गशेवगावात जर कारवाई होऊ शकते, तर बीड शहरात का नाही?ङ्ग असा प्रश्न विचारला जात आहे. कायद्यानुसार बंदी असूनही: राज्य सरकारने २०१२ पासून सुगंधित तंबाखू, मावा, गुटखा यांच्यावर बंदी घातली आहे. तरीही बीड शहरात कायद्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. मागणी - तात्काळ कठोर कारवाई करा लोकप्रतिनिधींनी आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष द्यावे, अशा मागण्या आता उघडपणे समोर येत आहेत.
सुगंधित तंबाखू आणि माव्याचा विळखा शहरात वाढत आहे. जर यावर आत्ता कठोर कारवाई झाली नाही, तर बीड शहरात व्यसनाधीन युवकांची संख्या आणि आरोग्यविषयक धोके वाढतील, यात शंका नाही. शेवगावात जर कायदा जागा असेल, तर बीड शहरात तो अंथरुणात का आहे?ङ्ग - हा प्रश्न आता प्रत्येक जागरूक नागरिक विचारतो आहे.

# दारूबंदीसाठी दुकानासमोरच महिलांचा ठिय्या

माजलगाव। प्रतिनिधी तालुक्यातील सिमरी पारगाव येथील तरुणांनी दोन महिन्यापूर्वी दिंद्रुड पोलिसांना गावातील दारू बंद करावी या मागणीसाठी तक्रार दिली होती. पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे संतापलेल्या महिलांनी चक्क दारू दुकानासमोरच गुरुवार (दि.१९) रोजी ठिय्या मांडत आंदोलन केले. सिमरी पारगाव येथे हनुमान मंदिरासमोरच दोन मांस विक्री होते. या गावांमध्ये अनेक दारूच्या दुकाना थाटलेल्या आहेत. यामुळे गावातील युवकांमध्ये व्यसनाचे प्रमाण वाढले होते. गावातील तरुणांनी दिंद्रुड पोलीस ठाण्यात दारूची दुकाने बंद करावी या मागणीसाठी दि.१९ एप्रिल रोजी तक्रार दिली होती. परंतू त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. दोन महिने उलटु नही पोलिसांनी दारू विक्रे त्यांना पाठीशी घालण्याचे काम केले. यामुळे संतप्त झालेल्या महिलांनी गुरुवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ज्या ठिकाणी दारू विक्री होते त्या ठिकाणी दबा धरून बसल्या व ज्यावेळेस दारू



घेण्यासाठी ग्राहक येत होते तेव्हा त्याला धरून परत पाठवत होत्या. त्यानंतर या महिलांनी दुकानदाराला जाब विचारत या दुकानासमोरच लोकशाही मार्गाने आंदोलन केले. याचीही दिंद्रुड पोलिसांना कसल्याच प्रकारची कल्पना नव्हती. आता कारवाई न झाल्यास या पुढचे आंदोलन पोलीस अधीक्षक यांच्या दालनात करण्यात येईल, असा इशारा गावातील महिलांनी दिला.

# वयोवृद्ध महिलेचा कान तोडून लुटले दागिने

केज। प्रतिनिधी तालुक्यातील लाडेवडगाव शिवारात एका वयोवृद्ध दांपत्याच्या शेतातील शेडमध्ये घुसून चार चोरट्यांनी तब्बल ७३ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना मंगळवार (दि.१७)रोजी मध्यरात्री घडली या घटनेत महिलेचा कान फाटून त्यांना गंभीर इजा झाली आहे. समाबाई तुकाराम लाड (वय ८०) ह्या मागील दोन दिवसांपासून त्या आपल्या पतीसोबत लाडेवडगाव शिवारातील अडीच एकर शेतात, पत्र्याच्या शेडमध्ये राहत होत्या.मंगळवार (दि.१७) च्या रात्री १ ते २ च्या सुमारास शेडबाहेर झोपलेल्या त्यांच्या पतीला काही अनोळखी व्यक्तीने शिवीगाळ करत झोपेतून उठवले. आवाज ऐकून समाबाई यांनी आतून आवाज दिला असता, त्यातल्याच एकाने दरवाजाला लाथ मारून आत प्रवेश केला. यावेळी समाबाई माझा मुलगा फौजी आहे, त्याला फोन लावते असे म्हणाल्या. मात्र त्या चोरट्याने त्यांचा मोबाईल हिसकावून घेत तुमच्यासोबतच्या दोन लहान मुली कुठे आहेत? असे विचारले. त्यावर घाबरलेल्या समाबाई यांनी ते दोघेच तिथे राहत असल्याचे सांगितले. चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ५ ग्रॅमचे मंगळसूत्र, नाकातील ३ ग्रॅमची नथ आणि कानातील ४ ग्रॅमचे फुले, एक साधा मोबाईल असा एकूण ७३ हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने हिसकावून घेतला.

# गेवराई न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी रु. निधी मंजुर-आ.पंडित

गेवराई दिवाणी न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी २ लक्ष रुपयांचा निधी मंजुर झाला असून या कामास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. गेवराई येथील न्यायालयाच्या अस्तित्वातील इमारतीवर अतिरिक्त एक मजला आणि चार नवीन कोर्ट हॉलच्या बांधकामाचा यामध्ये समावेश आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी निवडणुक जाहिरनाम्यामध्ये या कामाचे आश्वासन दिले होते. गेवराई न्यायालयीन इारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी २ लक्ष रुपयांचा निधी मंजुर केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांचे जाहिर आभार व्यक्त केले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आपल्या जाहिरनाम्यात आ. विजयसिंह पंडित यांनी गेवराई येथील न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासह गेवराई येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन मतदारांना दिले होते. आ. विजयसिंह पंडित यांनी आश्वासन पूर्तीसाठी निवडून आल्यानंतर सातत्याने प्रयत्न केले. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे अखेर गेवराई न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी २ लक्ष रुपयांचा निधी मंजुर झाला असून गुरुवार, दि.१९ जून रोजी विधी व न्याय विभागाने त्याच्या प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. अस्तित्वातील न्यायालयीन इमारतीवर अतिरिक्त एक मजला आणि चार कोर्ट हॉल यासह इलेक्ट्रिफिकेशन, अग्निशमन यंत्रणा, सीसीटीव्ही, एअर कंडीशन, फर्निचर, लिफ्ट आदी कामांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. गेवराई न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी निधी मंजुर केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा



राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे जाहिर आभार व्यक्त केले आहे. विविध विकास कामांच्या उद्घाटनासाठी दि.१९ मे रोजी ना. अजितदादा पवार गेवराई शहरात आले असताना गेवराई न्यायालयातील वकिल संघाच्यावतीने त्यांना या बाबतचे निवेदन देण्यात आले होते. या कार्यक्रमात ना. अजितदादा पवार यांनी या कामाच्या मंजुरीचा शब्द गेवराईकरांना दिला होता. दादांचा पक्का वादा महिनाभरात पूर्ण झाल्याचा अनुभव यानिमित्ताने गेवराईकरांना आला आहे. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर गेवराई न्यायालयात अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्याचा मार्ग सुकर होणार असल्याची माहिती यानिमित्ताने आ. विजयसिंह पंडित यांनी दिली आहे. गेवराई न्यायालयाच्या वकिल संघाचे पदाधिकारी व सदस्यांनी आ. विजयसिंह पंडित यांचे या कामाबद्दल आभार व्यक्त केले आहेत.

# डसॉल्ट अन रिलायन्स भारतात बनवणार एग्जीक्यूटिव्ह जेट नागपुरात होणार निर्मिती

फ्रान्सची एअरोस्पेस कंपनी डसॉल्ट एव्हिएशन आणि रिलायन्स एअरोस्ट्रक्चर लिमिटेडने भारतात फाल्कन 2000 एलएक्सएस एग्झीक्यूटिव्ह जेटची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. या जेटची निर्मिती नागपुरात होणार आहे. जागतिक बाजारासाठी सुद्धा या ठिकाणी जेट निर्माण करण्यात येणार आहे. 2028 पर्यंत पहिले जेट तयार होणार आहे. डसॉल्ट एव्हिएशन आणि रिलायन्सच्या करारानंतर अमेरिका, फ्रान्स, कॅनडा, ब्राझीलनंतर भारत पुढील पिढीतील व्यावसायिक जेट बनवणाऱ्या देशांच्या यादीत आला आहे. या करारामुळे नागपूरमधील डसॉल्ट रिलायन्स एअरोस्पेस लिमिटेडचा प्लॅंट 400,000 वर्ग फूटाने वाढवण्यात येणार आहे. यासाठी जवळपास 1,000 कोटींची गुंतवणूक नागपुरात होणार आहे. फाल्कन 2000 जेटसची निर्मिती प्रथमच फ्रान्स बाहेर फाल्कन 2000 जेटसची निर्मिती नागपुरात होणार आहे. त्यासाठी डसॉल्ट एव्हिएशन आणि रिलायन्स एरोस्पेस लि. यांच्यात ऐतिहासिक करार



झाला आहे. फाल्कन 2000 जेटसची निर्मिती प्रथमच फ्रान्सच्या बाहेर होत आहे. नागपूरमधील मिहानमध्ये होत असलेल्या या उत्पादनातून भारताच्या हवाई उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. भारतासाठी आणि जागतिक बाजारपेठेसाठी फाल्कन 2000 ची पूर्ण निर्मिती नागपुरात होणार आहे. तसेच फाल्कन 8 एक्स आणि 6 एक्सची असेम्ब्ली सुद्धा नागपुरात होईल. पहिले मेड इन इंडिया फाल्कन 2028 पर्यंत नागपुरात तयार होणार आहे. डसॉल्ट एव्हिएशनने म्हटले की, सन 2028 पर्यंत जेट बनून तयार होईल. डसॉल्ट एव्हिएशनने पॅरिस एअर शोमध्ये एक वक्तव्य दिले. त्यानुसार, कंपनी प्रथमच फ्रान्सबाहेर फाल्कन 2000 जेटची निर्मिती करणार आहे. भारतासाठी हा ऐतिहासिक क्षण आहे. कारण भारत अमेरिका, फ्रान्स, कॅनाडा आणि ब्राझील या व्यावसायिक विमान निर्मिती देशांच्या पक्तींत जाऊन बसला आहे. भारत आणि फ्रान्समधील करार अशा वेळी झाला जेव्हा 787 ड्रिमलाइनर बनवणारी अमेरिकेची बोइंग विमानाच्या सुरक्षेवर चिंता व्यक्त होत आहे. अहमदाबाद विमान अपघातानंतर या विमानांच्या सुरक्षेचे मुद्दा चर्चेत आला.

## तहसिलदार वैशाली पाटील यांच्या लेखी आश्वासनाने अशोक साळवे यांचे उपोषण मागे

आष्टी-प्रतिनिधी तालुक्यातील अनेक गोरगरीब निराधार,दिव्यांग लाभार्थी हे गेले सहा महिन्यापासुन संजय गांधी निराधार,श्रावणबाळ योजनेचे रमाई घरकूल, पंतप्रधान घरकुल योजनेचे मानधन व निधीपासुन वंचीत आहेत.त्या लोकांवर उपसमारीची वेळ आलेले आहे. पंचायत समितीमध्ये घरकुल धारकांना सहा महिन्यापासुन हप्ता दिला गेला नाही.आष्टी पंचायत समितीमधील घरकुल विभागातील कर्मचारी व अधिकारी हाताकडे पाहतात. त्यांचा बंदोबस्त करण्यात यावा. गरीबांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्यांवर कारवाई व्हावी तसेच तहसिलदार यांनी गटविकास, अधिकारी यांना घरकुलांचे पैसे देण्याचा आदेश द्यावा या व ईतर मागण्यासाठी मंगळवार दि.१७ जुन रोजी तहसिल कार्यालयासमोर रिपाइं आठवले गट तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी उपोषण सुरु केले होते. तहसिलदार यांनी उपोषण कर्त्याच्या मागण्या संबंधित वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे पाठविल्या लवकरच या मागण्या पुर्ण होतील. तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिलेल्या लेखी पत्रात म्हटले इहे की,विशेष सहाय योजनेच्या लाभार्थ्यांना शासनाचे डीबीटी धोरणानुसार अनुदान शासन स्तरावरुन वितरीत करण्यात येते. शासन निर्णय २० ऑगस्ट २०१९ नुसार विशेष सहाय योजनेच्या लाभ घेण्यासाठी आधार कार्ड सक्तीचे केले आहे.आधार कार्डद्वारे शासन स्तरावरुन थेट लाभ हस्तांतरण करण्यात येत आहे.ज्या लाभार्थ्यांची माहिती आधारसह शासनाचे डीबीटी पोर्टलवर पडताळणी पूर्ण झाली अशा लाभार्थ्यांना शासन स्तरावरुन डीबीटीद्वारे अनुदान वितरीत करण्यात येत आहे. उर्वरीत लाभार्थ्यांची माहिती तलाठीस्तरावरुन संकलित करुन शासनाचे डीबीटी पोर्टलवर भरण्यावी प्रक्रिया सुरु आहे. ज्या लाभार्थ्यांना अनुदान मिळत नाही अशा लाभार्थ्यांना त्वरीत तलाठी कार्यालयात आपले कागदपत्रे जमा करणेबाबत या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्दी पत्रकाद्वारे लाभार्थ्यांना कळविण्यात आलेले आहे.ज्या लाभार्थीचे आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास प्राप्त झाले अशा लाभार्थ्यांना शासन स्तरावरुन अनुदान विततरीत होत आहे.उर्वरित लाभार्थ्यांची माहिती ऑनलाईन झालेनंतर त्याही लाभार्थ्यांना अनुदान वितरीत होणार आहे म्हणून उपोषण न करता उपोषणापासून परावृत्त व्हावे अशी विनंती केली आहे. यावेळी अव्वल कारकुन (शासन) भगीरथ धारक, पंचायत समितीचे अजय निंबाळकर, चव्हाण,रविंद्र ढोबळे,सचिन बाप्पा गोंदकर यांच्या मध्यस्थितीने हे उपोषण सुटले.तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी उपोषण मागे घेतले आहे.या उपोषणात तालुकाध्यक्ष अशोक साळवे, पॅंथर संभु साळवे, शांताराम जोगदंड, बाबासाहेब गायकवाड,पंढरीनाथ साबळे, रतन जाधव,युवराज साळवे, साखरबाई त्रिबक पाचपुते, कमल गोरख ससे, शिवबाई बन्शी काकडे, राधाबाई पोपट शिंदे,इंदुबाई बापु कदम, गयाबाई विनायक खंडागळे, लिलाबाई बाळु पवार, मालनबाई अंबादास धोत्रे,आयशा शिराज सय्यद, शिंदु अशोक निंबाळकर, सत्यभामा सुदाम जामदाडे, सुनिता बाळु जाधव,मंगल कचरु शिरोळे,गिता शिवाजी पवळ यांनी सहभाग घेतला होता.

## एमटीएस परीक्षेत कु.एशना वाव्हळकर हिने गोल्ड मेडल पटकावले



माजलगाव-प्रतिनिधी शहरातील वरद राजस्थानी प्राथमिक विद्यालय मध्ये इयता तिसरी वर्गात शिक्षण घेत असलेली कु.एशना विकास वाव्हळकर ही एम टी एस परीक्षेत ३०० पैकी १८८ गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे. सदरील परीक्षा महाराष्ट्र शासन मान्य परीक्षा असून ती परीक्षा राज्यस्तरीय स्तरावर आयोजित केली जाते. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमतेला चालना देण्यासाठी अशा परीक्षेचे आयोजन केले जाते. सदरील मुलगी ही पहील्या वर्गा पासुन अतिशय हुशार आहे . तिने हुशारीची चुणूक दाखवुन शाळेचे नाव आणि कतु त्वाचा ठसा उमटवला आहे. वरद राजस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तौर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली तिने हे घवघवीत यश संपादन केले आहे. सर्व स्तरातून शाळेचे तसेच कु. एशनाचे आई वडील यांच्या सह सर्व स्तरातून कौतुक होत असुन शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## श्री क्षेत्र महादेवदरा ते पंढरपूर पायी पालखी सोहळ्याचे २६ जुन रोजी प्रस्थान

आष्टी-प्रतिनिधी गेली तीन वर्षापासून आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील श्री क्षेत्र महादेवदरा येथुन आषाढी वारी निमित्त संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. कल्याण महाराज कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली पायी पालखी सोहळा जात आहे.यंदा गुरुवार दि.२६ जुन रोजी पायी पालखी सोहळ्याचे प्रस्थान होणार असुन रविवार दि.६ जुलै रोजी पंढरपूरला दिंडी सोहळा पोहचेल अशी माहिती ह.भ.प. कोल्हे महाराज यांनी दिली.वारकरी भावीक भक्तांनी आपले जीवन कृतार्थ करण्यासाठी महादेवाच्या पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन दिंडी चालकांनी केले आहे.पायी पालखीचा मार्ग देसुर, सालेवाडी, अरणगाव, कवडगाव, चापडगाव, जातेगाव, कामोणे, करमाळा, देवळाली, कु ंभेज फाटा, शेलगाव, पांगरे फाटा, कन्हेरगाव, वेणेगाव, दगडे अकोला, परिते, होळे, भोसे, करकंब, पंढरपूर असा राहणार आहे असे क्षेत्र विकासक ह.भ.प.कल्याण महाराज कोल्हे व समस्त ग्रामस्थ बीडसांगवी,महादेव मंदिर ट्रस्ट, महादेवदरा यांनी सांगितले.

## तुलसी इंग्लिश स्कूलचा गौरव : आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत राजरत्न कापसे याला ब्राँझ पदक

बीड-प्रतिनिधी येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीडचा विद्यार्थी राजरत्न कापसे याने मु ंबई येथील अंधेरी स्पोर्ट्र्स कॉम्प्लेक्स येथे नुकत्याच पार पडलेल्या २३ व्या इंटरनॅशनल स्पोर्ट्स जीत कुणे-डो कराटे स्पर्धा - २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत ब्राँझ मेडल मिळवले आहे. या स्पर्धेत भारतासह ५ ते ६ आंतरराष्ट्रीय संघांनी सहभाग नोंदवला होता. कठोर मेहनत, आत्मविश्वास आणि प्रबळ जिद्दीच्या जोरावर राजरत्नने हे यश मिळवले. ही स्पर्धा रविवारी,१५ तारखेला पार पडली. या यशामागे बीड जिल्ह्याचे प्रमुख कराटे प्रशिक्षक आणि जीत कुणे-डो असोसिएशनचे सचिव ॲड.




नितीन पवार यांचे तसेच महिला प्रतिनिधी ॲड.आरती सतकर मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. राजरत्नच्या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे सर, प्राचार्या सौ. उमा जगतकर मॅडम, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या अभिनंदनामुळे त्याला खूप आनंद आणि प्रोत्साहन मिळाले आह

# वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषद यंदा पुरस्कार देणार



वडवणी-प्रतिनिधी वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या मुख्य कार्यालयात एक खास बैठक घेऊन तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने यंदा बीड जिल्ह्यातल्या उत्कृष्ट मान्यवरांचा सन्मान करत पुरस्कार देणार असल्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. याबाबत अधिक वृत्त असे की, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे व जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदे च्या मुख्य कार्यालयात नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक घेऊन बैठकीत सर्वानुमते अनेक निर्णय घेण्यात आले. जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे, तालुकाध्यक्ष सतिश सोनवणे, सचिव महेश सदरे यांनी आपल्या मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने बीड जिल्ह्यांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यासाठी प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला सर्वांनी संमती दर्शवली असून बीड जिल्ह्यांत एकुण आकरा तालुक्यातील विविध क्षेत्रातील उत्कृष्ट काम करणाऱ्या मान्यवरांचा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त खास कार्यक्रमाचे आयोजन करुन राज्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. आपण केलेल्या आपल्या कार्याचा लेखाजोखा तपासणी करून पत्रकारीता, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील कार्याचा आधार घेऊन आपले प्रस्ताव सादर करावेत. यासाठी प्रेस नोट प्रसिद्ध करणार आहोत. या पुरस्कारासाठी आपण उत्सुक असल्यास आपले प्रस्ताव कधी केव्हा,कुठे आणि कसे पाठवायचे याची संपूर्ण माहिती लवकरच देणार आहोत. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा वर्धापन दिन हा प्रत्येक वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो. याच अनुषंगाने आम्ही वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने नवे ध्येय,नवी वाटचाल बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सुरू करत आहोत. असा सर्वानुमते ठराव आम्ही संमत करून पत्रकारांच्या हिताच्या विविध विषयावर देखील सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे,जेष्ठ मार्गदर्शक पत्रकार सुधाकर पोटभरे,तालुकाध्यक्ष पत्रकार सतिष सोनवणे, सचिव पत्रकार महेश सदरे, उपाध्यक्ष पत्रकार धम्मपाल डावरे, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष संपादक ओमप्रकाश साबळे, कोषाध्यक्ष पत्रकार वाजेद पठाण,शहराध्यक्ष पत्रकार गितांजली लव्हाळे मॅडम,पत्रकार हरिभाऊ पवार, पत्रकार अतुल जाधव,पत्रकार संभाजी लांडे, पत्रकार राम चौरे, पत्रकार विजय राऊत सह आदींची उपस्थिती होती.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com